# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०८/२०१९** **दिनांक ०७.११.२०१९**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०१.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.०७.११.२०१९ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी ०१.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२८७२/२०१९, दि.३०.१०.२०१९ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार गुरुवार दि.०७.११.२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष
०२. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०३. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह,सदस्य
०४. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०५. मा.श्रीमती अर्चना उत्तमराव कोते, सदस्या

मा.श्री.दी.म.मुगळीकर,भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.३० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

सभेचे सुरुवातीस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस माहिती दिली की, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे उत्तमराव रंभाजी शेळके विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर दाखल जनहित याचिका नं.१२०/२०१९ वर आज दि.०७.११.२०१९ रोजी मा.न्यायालयात सुनावणी झाली असुन त्यामध्ये मा.न्यायालयाने आजचे व्यवस्थापन समिती सभेच्या अजेंडयावरील फक्त विषय नं.५ व विषय नं.३६ या विषयावर निर्णय घेण्यास परवानगी दिलेली आहे. असे संस्थानचे वकील ॲड नितीन भवर यांनी भ्रमणध्वनीव्दारे कळविले आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्देशानुसार मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं. १ ते ४ यावर कोणतीही चर्चा न करता सदरचे विषय स्थगीत ठेवण्यात आले.**

---

**विषय नं.०५** **चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**अ) कोल्हापुर व सांगली जिल्हयातील पुरग्रस्तांना मदतीकरीता "मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रक्कम रु.१० कोटी जिल्हाधिकारी कोल्हापुर व सांगली यांना प्रत्येकी रक्कम रु.१ कोटी अशी एकूण रक्कम रु.१२ कोटी अर्थसहाय्य देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** कोल्हापुर व सांगली जिल्हयात दि.०४.०८.२०१९ नंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे तेथील नद्यांना महापुर येऊन दोन्ही जिल्हयातील जनतेवर नैसर्गीक संकट कोसळून मोठया प्रमाणात जिवित व आर्थिक हानी झालेली आहे. तेथील पुरग्रस्तांना मानवतेच्या दृष्टीकोनातून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने रु.१०लाख मात्रची औषधे,१ रुग्णवाहीका व त्यासोबत २० डॉक्टरांचे पथक काही कालावधीसाठी पाठविणेस तसेच मानवतेच्या दृष्टीकोनातून उपरोक्त जिल्हयातील पुरग्रस्तांसाठी मदत म्हणून, रक्कम रु.१० कोटी मात्र (अक्षरी रक्कम रुपये दहा कोटी) इतकी रक्कम "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" महाराष्ट्र राज्य यांचेकडे जमा

करणेस मान्यता मिळणेकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. त्यावर मा.न्यायालयाने खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाचे आदेश:-

this being a bonafide suggestion and a step forward to provide necessary assistance to these flood affected districts, we welcome the suggestion and accordingly we direct the applicant-Shirdi Sansthan to provide a financial assistance of Rs.One Crore to each district i.e. District Kolhapur and District Sangli and this amount be disbursed in favour of the District Collector, Kolhapur, and District Collector, Sangli.

On receipt of such amount, the District Collector Kolhapur and the District Collector, Sangli to utilize this amount mainly for the fumigation exercise, needless to state that by seeking assistance from the Animal Husbandry Department of the Veterinary Department.

मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठाचे वरील आदेशानुसार, शासन मान्यतेच्या अधिन राहुन कोल्हापूर व सांगली जिल्हयातील पुरग्रस्तांसाठी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशान्वये मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रक्कम रु. १० कोटी, जिल्हाधिकारी कोल्हापूर व जिल्हाधिकारी सांगली यांना प्रत्येकी रक्कम रु. १ कोटी असे एकूण १२ कोटी अर्थसहाय्य देण्यास तसेच रु.१०लाख मात्रची औषधे, १ रुग्णवाहीका व त्यासोबत २० डॉक्टरांचे पथक काही कालावधीसाठी पाठविणेस मान्यता मिळावी.

**निर्णय क्र.४७८/अ यावर सविस्तर चर्चा होऊन, कोल्हापुर व सांगली जिल्हयातील पुरग्रस्तांना मदतीकरीता "मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रक्कम रु.१० कोटी जिल्हाधिकारी कोल्हापुर व सांगली यांना प्रत्येकी रक्कम रु.१ कोटी अशी एकूण रक्कम रु.१२ कोटी अर्थसहाय्य देणेबाबतच्या प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे, त्याचे अवलोकन करुन आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.०५ चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**ब) आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन शासनास सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ संस्थानसाठी लागु केला असुन त्यानुसार संस्थानचे कामकाज सुरु आहे. अधिनियम २००४ मध्ये कलम १७(२)(ग) मधील तरतुदीनुसार "विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडुन पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील व २९(१) मधील तरतुदीनुसार समिती त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमाखर्चाचा तपशिल दर्शविणारा, दि.३१ मार्च रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडुन आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थांची (पूर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० सप्टेंबरच्या आत सादर करील. " अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र राज्य विधी व न्याय विभाग यांनीसासंवि-१०१९/२८३/प्र.क्र.५१/का.१६ दि.०७.०८.२०१९ अन्वये मे.मुकूंद एम. चितळे ॲन्ड कं., चार्टर्ड अकौटंटस्, मुंबई यांची सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षक लेखापरिक्षक म्हणुन मान्यता दिली होती. त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/अंलेप/१७८९/२०१९ दि.०९.०८.२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. कार्यादेशास अनुसरुन त्यांनी आर्थिक वर्ष २०१८-१९ चे वैधानिक लेखापरिक्षण पूर्ण केले असून वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची प्रत त्यांनी ई-मेलद्वारे संस्थानला सादर केली आहे. सदर अहवालाची नोंद घेऊन त्याची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्तांना सादर करणे आवश्यक आहे. अहवालात निदर्शनास आणून दिलेल्या दोष/अपुर्ततांची दोष दुरुस्ती संबंधीत विभागांकडून करुन दोष दुरुस्ती अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल. संस्थान अधिनियम २००४ मधील कलम २९(२) नुसार दरवर्षी संस्थानचा वार्षिक अहवाल

(प्रशासकीय अहवाल व लेखापरिक्षण अहवाल) प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधी मंडळासमोर ठेवणे बंधनकारक आहे.

तरी आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणेस व त्याची एक प्रत राज्य शासनास अधिवेशनात विधीमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवणेकामी व एक प्रत धर्मदाय आयुक्त यांना सादर करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचेसभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४७८/ब यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन शासनास सादर करण्यास चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करुन आजचे व्यवस्थापन समितीचे सभेत त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०५ चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**क) आयकर कायद्यातील तरतुदींन्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांस सर्व माध्यमाद्वारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३) (C) (V) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारीत तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

"Provided also that the fund of trust or institution [or any university or other educational institution or any hospital or other medical institution] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [or sub-clause (vi) or sub-clause (VIA)]

d) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते खर्च न झाल्यास या ८५% उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पुर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायद्यातील तरतुदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागु असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण झाले असुन सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरण आयकर कार्यालयाकडे दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल याबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक असते. पुढील पाच वर्षात संस्थानचे उद्दीष्टांवर होणा-या खर्चाचा ढोबळ मसुदा प्रस्तावित केला आहे. त्यामध्ये आर्थिक वर्ष २०१८-१९ चे अखर्चित उत्पन्न रु.३५० कोटी खर्चाच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| १ | मंदिराची विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे, स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे, देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे. |
| २ | भक्तांना प्रसाद भोजन देणेआणि अन्नछत्र चालविणे, पाणी योजनेकरिता. |
| ३ | भक्तांना दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोई व सुविधा पुरविणे,दर्शनरांग प्रकल्प. |
| ४ | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी भक्तनिवास, विश्रामगृहे बांधणे, त्याची दुरुस्ती देखभाल करणे, भक्तांकरिता साईसिटी प्रकल्प निर्मिती . |
| ५ | शासन मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, सोसायटी यांचे शैक्षणिक संस्था, क्रिडा , संस्था वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरीकदृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर |

| | |
|---|---|
| | धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला व साहित्यक्षेत्राशी संबधीत असलेली संस्था, कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना वदेखभाल करवून घेणे,शैक्षणिक संकुल. |
| ६ | स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी, संस्थानच्या सोईमंध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे. |
| ७ | भक्तांच्या-जनतेच्या सोयीसाठी संस्थानच्या २५ कि.मी. परिसरातील रस्त्यांची कामे करणे. |
| ८ | मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवता आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देणे. |
| ९ | संस्थानच्या वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदीत नमुद केलेनुसार संस्थानचे नियोजीत उद्दीष्टांवर खर्च करणे. |

तरी संस्थानचे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्याकरीता सन २०१८-१९ चे अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षांत खर्च करण्याच्या नियोजनाचा मसुदा जोडून संस्थानचे आर्थिक वर्ष २०१८-१९ चे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४७८/क यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्याकरीता सन २०१८-१९ चे अखर्चित उत्पन्न रु.३५० कोटी मात्र पुढील पाच वर्षात खर्च करण्याच्या नियोजनाचा उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे ढोबळ मसुदा जोडून आर्थिक वर्ष २०१८-१९ चे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्यास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करुन आजचे व्यवस्थापन समितीचे सभेत त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.०६ ते ३५ यावर कोणतीही चर्चा न करता सदरचे विषय स्थगीत ठेवण्यात आले.**

---

**विषय नं.३६ दि.०२ व ०३ डिसेंबर रोजी मिलिट्री तुकडीव्दारे शिर्डी येथे दहशतवाद प्रतिबंधक सरावची रंगीत तालीम घेणेबाबत**

**प्रस्ताव-** नॅशनल सिक्युरिटी गार्ड, पालम, नवी दिल्ली चे जा.क्र. नं.UO No.60023/01/2019/Ops/HQ NSG/2407 दि.३०/०८/२०१९ रोजीचा फॅक्स संदेशाद्वारे कुलबीर सिंग, ग्रृप कमांडंट यांनी नॅशनल सिक्युरिटी गार्ड यांचे मार्फतीने दि.०२ ते ०४ सप्टेबर, २०१९ रोजी श्री साई मंदिर येथील संवेदनशील परिसराची पाहणी करणेस येत असलेबाबत कळविले होते. त्याकामी संपर्क अधिकाऱ्यांची नांवे कळविणेस व कन्फरमेशन लेटर देणेस कळविले होते. त्यानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/वशि/संरक्षण/२१२८/२०१९ दि.३१/०८/२०१९ चे पत्राने कन्फरमेशन लेटर देवून त्यामध्ये संपर्क अधिकारी म्हणुन १) श्री मधुकर गंगावणे, संरक्षण अधिकारी २) श्री संजय पाटणी, सुरक्षा निरीक्षक ३) श्री भाऊसाहेब सदाफळ, सुरक्षा अधिकारी, CISS सिक्युरिटी यांची नेमणुक करणेत आलेचे कळविणेत आले आहे.

त्याकामी संरक्षण विभाग दि.३१/०८/२०१९ चे टिपणी अन्वये संबंधीत अधिकारी यांची निवास, भोजन, दर्शन-आरती, वाहन व्यवस्था करणेबाबत मान्यता घेवून संबंधीत विभागांना कळविणेत आले होते. तथापी दरम्यानचे कालावधीत गणेशोत्सव असल्याने संबंधीत अधिकारी यांनी शिर्डी येथे येण्याचे रद्द करण्यात आलेचे कळविले होते. यानंतर संबंधीतांनी दि.१६/०९/२०१९ रोजी दुरध्वनीद्वारे दि.१६/०९/२०१९ ते दि.१८/०९/२०१९ अखेर तीन दिवस शिर्डी येथे येत असलेबाबत कळवून दि.१६/०९/२०१९ व दि.१७/०९/२०१९ रोजी साई मंदिराची व संस्थानचे इतर महत्वाचे विभागाची पाहणी केली आहे. व दि.१७/०९/२०१९ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच इतर अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन बैठकीमध्ये डिसेंबर महिन्याचे पहिल्या आठवडयामध्ये साई मंदिर शिर्डी येथे मिलीट्रीचे पथकाद्वारे दहशतवाद प्रतिबंधक सरावाची रंगीत तालीम घेणार असल्याचे चर्चा केली. यानंतर संबंधीत अधिकारी यांनी दि.१८/०९/२०१९ रोजी शिर्डी विमानतळाची पहाणी करुन रवाना झाले.

आता नॅशनल सिक्युरिटी गार्ड,पालम,नवी दिल्ली यांनी जा.25023/05/2019/Trg/HQNSG/3607 दि.३०/०९/२०१९ रोजीचे फॅक्स संदेशानुसार श्री साई मंदिर शिर्डी येथे दि.०२ व ०३ डिसेंबर २०१९ रोजी

मिलीट्री तुकडीद्वारे दहशतवाद प्रतिबंधक रंगीत तालीम घेण्यात येणार असलेबाबत कळविले असुन शिर्डी साई मंदिर या प्रशिक्षणासाठी निवडले गेलेल्या उद्दीष्टापैकी एक लक्ष आहे. सरावामुळे मंदिरातील नियमीत कामांना बाधा येणार नाही. वरील बाबी लक्षात घेता साई बाबा मंदिर परिसर, शिर्डी येथे सराव घेण्यास परवानगी द्यावी व त्याकामी खालीलप्रमाणे पुर्तता करावी असे कळविले आहे.

१) संबंधीत लक्ष्याचे ब्ल्यु प्रिंट व फ्लोअर प्लॅन उपलब्ध करुन द्यावेत.

२) टास्क फोर्स करीता सुयोग्य पार्कींग व प्रशासनीक ठिकाण उपलब्ध करुन द्यावे.

३) सरावास सहाय्य करण्यासाठी योग्य माहितगार व्यक्ती द्यावा.

NSG चे संपर्क अधिकारी म्हणुन मेजर Sidram Solaka (Mobile No.7400428262) यांची आपले अधिकाऱ्यांशी प्राथमिक चर्चा/रेकी करण्यासाठी नेमणुक करण्यात आलेचे कळविले आहे.

नॅशनल सिक्युरिटी गार्ड, पालम, नवी दिल्ली मार्फत दि.०२ व ०३ डिसेंबर २०१९ रोजी शिर्डी येथे मिलीट्री तुकडीद्वारे दहशतवाद विरोधी सरावाची रंगीत तालीम घेण्यास परवागी देता येईल व त्याकामी श्री साई मंदिर परिसराचे नकाशाची ब्ल्यु प्रिंट (निळे मुद्रण) बांधकाम विभागामार्फत संबंधीतास उपलब्ध करुन देता येईल.

टास्क फोर्स करीता पार्कींग व प्रशासनीक ठिकाणाबाबत दि.१२/१०/२०१९ रोजी मेजर सिदराम सोलंका यांचेशी मो.नं. ७४००४२६२८२ वर दुरध्वनीद्वारे संपर्क केला असता त्यांनी ऑपरेशनमध्ये सुमारे १६० अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग असणार असून सुमारे २० लहान मोठे वाहने असतील अशी माहिती दिली आहे. तसेच सदरचा प्रोग्राम निश्चीतीचे तारखे अगोदर आम्ही प्रत्यक्ष पाहणी करुन, चर्चा करुन पुढील सुचना देवू असे सांगितले.

त्यानुषंगाने टास्क फोर्सकरीता मंदिराचे लगत असलेला गेट नं.०४ चे बाहेरील बाजुस रोड व त्रिकोणमधील जागा पार्कींग करीता उपलब्ध करुन देता येईल व प्रशासकीय कामकाजाकरीता संस्थानचे साई सभागृह (0 नंबर मिटींग हॉल) उपलब्ध करुन देता येईल. संस्थानमार्फत संपर्क अधिकारी म्हणुन खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणुक करता येईल, असे नम्र मत आहे.

१) श्री मधुकर गंगावणे, संरक्षण अधिकारी

२) श्री संजय पाटणी, सुरक्षा निरीक्षक

३) श्री भाऊसाहेब सदाफळ, सुरक्षा अधिकारी, CISS सिक्युरिटी.

तरी नॅशनल सिक्युरिटी गार्ड, पालम,नवी दिल्ली यांचे मार्फतीने दि.०२ व ०३ डिसेंबर २०१९ रोजी अथवा सदर तारखेत बदल झाल्यास यानंतर जी तारीख निश्चीत करण्यात येईल त्या तारखेस मिलीट्री तुकडीद्वारे साई मंदिर शिर्डी येथे दशहवाद विरोधी सरावाची रंगीत तालीम घेण्यास व त्याकामी येणारे अधिकारी व कर्मचारी यांना वरीलप्रमाणे पार्कींग, प्रशासकीय कामाकरीता हॉल/साईसभागृह, मंदिर परिसराचे ब्ल्यु प्रिंट नकाशे, आवश्यकतेनुसार निवास, भोजन इत्यादी सुविधा संस्थानमार्फत मोफत उपलब्ध करुन देणेकामी सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नॅशनल सिक्युरिटी गार्ड, पालम, नवी दिल्ली यांचे मार्फत दि.०२ व ०३ डिसेंबर २०१९ रोजी अथवा सदर तारखेत बदल झाल्यास यानंतर जी तारीख निश्चीत करण्यात येईल त्या तारखेस शेजारती झाल्यांनतर रात्रौ ११ ते पहाटे ४ वाजेपर्यंत शिर्डी येथे दहशतवाद प्रतिबंधक सरावाची रंगीत तालीम घेणेकामी खालील प्रमाणे व्यवस्था करण्यात यावी, असे ठरले.**

**१. प्रशासकीय कामकाजाकरीता संस्थानचे साई सभागृह उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**२. संस्थानमार्फत संपर्क अधिकारी म्हणून श्री.मधुकर गंगावणे,संरक्षण अधिकारी, श्री.संजय पाटणी,सुरक्षा निरीक्षक व श्री.भाऊसाहेब सदाफळ, सुरक्षा अधिकारी, CISS सिक्युरिटी यांची नियुक्ती करण्यात यावी.**

**३. आवश्यकतेनुसार व्दारावती येथे निशुल्क निवासव्यवस्था करण्यात यावी.**

**४. श्री साई प्रसादालयामध्ये निशुल्क भोजन व्यवस्था करण्यात यावी.**

**५. पार्कींगची व्यवस्था चार नंबर गेटसमोरील त्रिकोणाचे जागेत करण्यात यावी.**

**६. संबधीतांना मंदिर परिसराचे ब्ल्यु प्रिंट नकाशे उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग/ मंदिर विभाग/ साईप्रसाद निवासस्थान/ व्दारावती निवासस्थान/श्री साई प्रसादालय/ बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३७ ते ५० यावर कोणतीही चर्चा न करता सदरचे विषय स्थगीत ठेवण्यात आले.**

---

वरील निर्णय क्र.४७८ ते ४७९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०३.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (दी.म.मुगळीकर,भा.प्र.से) | (सुरेश हावरे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.